तमसो मा ज्योतिर्गमय

Marathwada Shikshan Prasarak Mandal's

# Balbhim Arts, Science & Commerce College, Beed (M.S.) India

NAAC Reaccredited 'A'. Grade     College with Potential for Excellence     ISO Certified : 9001-2008

ज्ञान-विज्ञानं विमुक्तये

## U.G.C. Sponsored One Day Interdisciplinary International Conference On
## "RELEVANCE OF GANDHIAN THOUGHTS"

Organized by



### Gandhian Study Centre

# Certificate

*This is to certify that Dr./Prof. Mr./Ms.* विश्वनाथ महादेव आवड

शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज.

*attended One Day Interdisciplinary International Conference on "Relevance of Gandhian Thoughts" organized by Gandhian Study Centre, Balbhim Arts, Science & Commerce College, Beed on 7th April 2016. He/She has also chaired session/ acted as resource person/ presented a paper entitled*

गांधी विचारांना नव्या प्रतीकांची गरज

**Prof. Shailesh Akulwar**
Co-ordinator & Organizing Secretary


**Dr. Vasant Sanap**
Principal & Chief Organizing Secretary

ISSN: 2229-4856

Abhisaran

VOL. XV SPECIAL ISSUE APRIL 2016

# RELEVANCE OF GANDHIAN THOUGHTS



PART III

*Editors*

**Dr. Vasant Sanap**

**Mr. Shailesh Akulwar**

2

ISSN: 2229-4856

# ABHISARAN

VOL. XV SPECIAL ISSUE APRIL 2016

Half Yearly Journal

One Day Interdisciplinary International Conference On

## Relevance Of Gandhian Thoughts

(7th April, 2016)

**PART- 3**

*Chief Editor*

**Dr. Vasant Sanap**

Principal, Balbhim Arts, Science & Commerce College, Beed

*Editor*

**Mr. Shailesh Akulwar**

Co-ordinator, Gandhian Study Centre

Head, Dept. of Public Administration

Balbhim Arts, Science & Commerce College, Beed

*Co-editor*

**Dr. Ravindra Kale**

Head, Dept. of Political Science

Balbhim Arts, Science & Commerce College, Beed

M.S.P. MANDAL'S

**BALBHIM ARTS, SCIENCE & COMMERCE COLLEGE, BEED-431 122**

NAAC Reaccredited 'A' Grade | College with Potential for Excellence

ISO Certified: 9001-2008 | Email: mspmbeed@gmail.com

# अनुक्रमणिका


१. महात्मा गांधीजी के आंतकवाद हिंसा पर विजय विचार
- Dr. Bhange C. B. । ७

२. महात्मा गांधी और ग्रामस्वराज्य - प्रा.डॉ.शेषराव लिंबाजी राठोड । ११

३. गांधीजी के सिध्दांत -डॉ. आलिया मेराज सय्यद (पठाण) । १६

४. गाँधी जी की विचारधारा और हिन्दी साहित्य -डॉ.बाबासाहेब कोकाटे । २१

५. हिंदी साहित्य पर गांधी विचारधारा का प्रभाव- प्रा. डॉ. बळीराम राख । २५

६. डॉ. विवेकी राय का कथेत्तर साहित्य और महात्मा गांध -संतोष घल्डे । २९

७. महात्मा गांधी व ग्राम स्वराज्य - प्रा. कुलकर्णी गोपाळ अनंतराव । ३४

८. हिन्दी साहित्य पर गांधी विचारों का प्रभाव .... - प्रा. प्रकाश बन्सीधर खुळे । ३७

९. म. गांधी : राज्यहीन अहिंसात्मक समाज -प्रा.अविनाश पांचाळ । ४१

१०. महात्मा गांधीजी का अहिंसात्मक सिध्दांत -प्रा. लक्ष्मण एफ. शिराळे । ४५

११. प्रगतिवादी हिंदी काव्यपर गाँधीवादी विचारधारा का प्रभाव - डॉ.योगेश दाणे । ४९

१२. गांधी जी के ग्रामस्वराज्य सम्बन्धी विचार
- शेख मोईन नईम, प्रा.संजय हिंगोणेकर । ५४

१३. गांधी विचारांना नव्या प्रतीकांची गरज - प्रा.विश्वनाथ आवड । ५७

१४. महात्मा गांधी वर्णित सप्त सामाजिक पापे - प्रा. शैलजा बरूरे । ६२

१५. महात्मा गांधीजींचे शैक्षणिक धोरण - प्रा. डॉ. बोचरे जे. एम. । ६७

१६. महात्मा गांधी यांचे राष्ट्रीय एकात्मतेविषयी विचार - एक अभ्यास
- श्री. भिमाशंकर मधुसूदन डहाळके । ७०

१७. म. गांधीजींचे सामाजिक, राजकीय आणि आर्थिक चिंतन
- देशमुख पापा शिवाजीराव । ७४

१८. महात्मा गांधी आणि अहिंसा
- प्रा.डॉ. देशमुख सुभाष जगन्नाथ , श्री. गर्जे राहुल रामराव । ७९

१९. गांधीजींच्या असहकार चळवळीतील तत्वांची उपयुक्तता
- डॉ.नूतन भानुदास चव्हाण । ८३

२०. महात्मा गांधी आणि सर्वोदय - डॉ. ओ.व्ही. लिगाडे । ८७

२१. महात्मा गांधी यांचे सामाजिक, आर्थिक आणि राजकीय विचार
-प्रा. डॉ. शंकर चव्हाण । ९२

२२. महात्मा गांधींचे सामाजिक व आर्थिक विचार - डॉ. ढास डी.के. । ९६

२३. महात्मा गांधीजींचे ग्राम स्वराज्य विषयक विचार -डॉ.विश्वास र. कदम । १०१

२४. महात्मा गांधी : हिंदूत्त्व दर्शन, धर्म आणि राजकारण - शेख फेरोज जफर । १०९

२५. गांधीवाद आणि मराठी साहित्य -प्रा.महारुद्र जगताप । ११३

८

1.

# 13.
# गांधी विचारांना नव्या प्रतीकांची गरज

**प्रा.विश्वनाथ महादेव आवड**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख,
शंकरराव मोहिते महाविद्यालय, अकलूज.

**प्रस्तावना :-** ३० जानेवारी १९४८ रोजी नथुरामने गांधीजीची हत्या केली त्याने गांधीजींना शरिराने संपविले पण नथुरामला जे पाहिजे होते ते साध्य झालेच नाही याउलट गांधी विचार संपूर्ण व्यापून राहिले. गांधीजींना मिळालेल्या विचारांचा वारसा हा मुळातच गुंतागुंतीचा होता कारण त्यांच्या विचारातील अंतर्विरोध ध्यानात घेता त्यांचे विचार जेवढे संकीर्ण तेवढे त्याचे व्यक्तीमत्व संकीर्ण वाटते. आज गांधीवादी विचारांची कुणी कशी अवेहलना केली हे सर्वांना ज्ञात आहेच. भांडवलशाही अर्थव्यवस्थेत पर्यावरणनिष्ठता, ग्रामसभा, शिक्षण अशा अनेक गोष्टीकडे गांधीच्या दृष्टीने पाहण्याची आवश्यकता आहे तरीपण गांधी विचारांचे मर्म जाणून घेताना त्यांचे विचार आजच्या काळात किती उपयुक्त ठरू शकतात यासाठी त्या विचारांना नवीन आयामांची/प्रतिकांची आवश्यकता वाटते. याच अनुषंगाने सदर निबंधामध्ये विषयाची मांडणी केलेली आहे.

**गांधी विचारधारा :** मुळातच या विषयाची मांडणी करताना सरसकट गांधी तत्वज्ञानाची मांडणी न करता काही महत्वाचे मुद्दे याठिकाणी घेतलेले आहेत.

१) गांधी विचारधारा ही सर्वव्यापी स्वरूपाची आहे हे जरी मान्य केले तरी त्यांच्या विचारातील सर्वधर्मसमभाव विचार स्विकारताना आज मात्र बळी तो कानपिळी हा न्याय धार्मिकदृष्टया निर्माण झालेला दिसतो. "वैष्णव जन तो" या शब्दांची चिरफाड करून सरळ सरळ हिंसेचा मार्ग अवलंबिलेला दिसतो. धर्म आणि राजसत्ता या दोन्ही गोष्टी समाजातल्या शेवटच्या माणसाचे अश्रू पुसण्यासाठी असायला हव्यात असे गांधी म्हणतात पण आज राजसत्ता म्हणजे केवळ लक्ष्मीपूजनासाठी वापरण्याचे साधन बनलेली दिसते.

२) विश्वस्तनिधी, स्वराज्य, ब्रम्हचर्य, ग्रामराज्य, शिक्षण असे अनेक विषय वा प्रश्नांना गांधीजींनी आपल्या हयातीत उत्तरे शोधण्याचा प्रयत्न केले पण ज्या पध्दतीने आज त्यांचे विचार मोडून-तोडून मांडले जातात ती पध्दती चुकीची आहे.

३) गांधी विचारातील स्वराज्य ही संकल्पना सरळ सरळ बाजूला सा ग्रामराज्य/ रामराज्य झाले पाहिजे या मांडणीला छेद देवून घराणेशाही एकाधीकारशाही निर्माण झालेली दिसते आणि सद्यस्थितीमध्ये तर गांधी विचारांवर शेवटचा हल्ला करण्याचा प्रयत्न केला जातो आहे. त्यांचे प्रतीक म्हणजे नथुरामचे उदात्तीकरण.

**गांधी विचारांना नवीन प्रतीके देताना खालील गोष्टींची आवश्यकता आहे.**

१) सुरूवातीला स्पष्ट करावे लागते की, गांधी समर्थकांनी गांधी विचारांचा जयजयकार आणि पूजा अर्चा बंद केली पाहिजे. कारण नव्याने जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर नव्या पिढीला यामध्ये आजिबात स्वारस्य नाही त्यातुनच एका बाजूला पध्दतशिरपणे गांधी अचार, विचार मर्यादित करण्याचे प्रयत्न चालू आहेत. काही जणांना गांधी विचार म्हणजे मजबूरी वाटायला लागली आहे. त्यामुळे गांधी समर्थकांनी मूळातच गांधी समर्थकांनी आजपर्यंत जी पूजा अर्चा बांधली त्यांनी प्रत्यक्षात गांधीजींचा किती विचार स्विकारला हा भाग पाहिला तर शोकांतीका आहे पण ज्या पध्दतीने गांधीना महात्मा पदी बसवून त्याच्या विचारांची अवहेलना केली जात आहे ते थांबले पाहिजे. कोणत्याही तत्वज्ञानाची अंधपणाने पूजा सुरू झाली की त्या तत्वज्ञानाला टोकाचा विरोध सुरू होतो.

२) भारतात केवळ गांधीवादी विचारधाराच आहे असे नाही तर हिंदूत्ववादी, आंबेडकरवादी, डावे, उजवे, मार्क्सवादी, क्रांतीकारी असे अनेक विचार आहेत पण स्वातंत्र्यपूर्व काळापासून केवळ गांधी विचारांची मांडणी सर्वश्रेष्ठ मानल्यामुळे बाकीच्या विचारधारा गांधी विचारधारेच्या विरोधात गेलेल्या दिसतात.

३) आजपर्यंतचे देशाचे राजकारण गांधी म्हणजेच काँग्रेस आणि गांधी घराणे यामध्येच मर्यादित झालेले दिसते. काँग्रेसला स्वातंत्र लढ्याची पार्श्वभूमी जरूर आहे पण काँग्रेस विसर्जीत करा असे गांधींनी सांगितले होते पण गांधीजींच्या नावाचा खुबीने काँग्रेसने वापर करून घेतला. परिणामी गांधीजी खरेतर संपूर्ण देशाचे व्हायला हवे होते पण ते फक्त काँग्रेस या एका राजकिय पक्षाचे प्रतीक झाले. २०१४ च्या लोकसभा निवडणूकामध्ये किंवा त्यानंतर जनतेसमोर असलेली प्रतीके बदलण्याचा जाणीव पूर्वक प्रयत्न चालू आहेत. त्यातुनच गांधीजी तुमचे तर सरदार पटेल आमचे अशी मांडणी होवू लागलेली दिसते. गांधी प्रतिमेला कवटाळून बसलेल्या काँग्रेसने या गोष्टींचा कधी विचार केलेला दिसत नाही.

४) गांधी वारसा नव्याने मांडायचा असेल तर गांधीच्या निर्गुण निराकार स्वरूपाकडे पहावे लागेल. मोहनदास करमचंद गांधी यांच्या विचारावर होणारी टिका सहन करावी लागेल आणि ती बंद होण्यासाठी प्रयत्न करावे लागतील. गांधी विचारातील अंतर्विरोध असा दिसतो की, वर्णव्यवस्थेचे समर्थन गांधी विचारामध्ये आहे पण स्पृश्यास्पृश्यतेचा मेळ कधी बसू शकला नाही त्याचप्रमाणे दरिद्री नारायण हि संकल्पना आजच्या भांडवलशाही मध्ये सामान्याला अतिसामान्य करते आहे याचे आकलन गांधीवादामध्ये होताना दिसत नाही. त्यामुळे प्राप्त परिस्थितीमध्ये निर्माण झालेल्या प्रश्नांना गांधी विचारातून कसे मार्गदर्शन केले जावू शकते हे नवीन पिढीला सांगावे लागेल.

५) गांधीनी आधुनिक संस्कृतीला नवीन पर्याय देण्याचे स्वप्न मांडले पण त्या पर्यायी संस्कृतीचा आराखडा किंवा नकाशा/पर्यायी दिशा गांधी देवू शकले नाहीत. स्त्रियांच्या व्यथा व समस्या नैतिक पातळ्यावर मांडण्याचा प्रयत्न झाला पण व्यवहारीक पातळीवर या समस्या सोडविण्यासाठी गांधी वादामध्ये उत्तरे आढळत नाहीत. एकादी विचारधारा प्रश्नांची उत्तरे द्यायला असमर्थ असेल तर ती विचारधारा लोक नाकारायला सुरवात करतात.

६) ब्रम्हचर्य पालनाच्या बाबतीत वयाच्या ३८ व्या वर्षी गांधीनी ब्रम्हचर्य पालनाची शपथ घेतली त्यादृष्टीने साधे राहणे त्यांना सोपे गेले, ब्रम्हचर्य पालनाच्या बाबतीत त्यांनी अनेक गुंतागुंतीचे नियमही घालून घेतले पण त्यांचा पत्रव्यवहार व ब्रम्हचर्याचे प्रयोग काही प्रमाणात कामूक आचरणामध्ये अडकलेले दिसतात. 'इंडियन ओपिनियन' मध्ये गांधी सांगतात कि विवाह न करणे हे प्रत्येक विचारी भारतीयांचे कर्तव्य आहे तरीही त्याला विवाह टाळता येणार नसेल तर त्याने त्याच्या पत्नीशी लैंगिक संबंध मात्र टाळावेत हा विचारच मुळात प्रचंड अंतर्विरोध निर्माण करतो. म्हणून ब्रम्हचर्याच्या बाबतीत गांधीजींची भुमीका व्यवस्थितपणे मांडावी लागेल की गांधी केवळ शारिरीक ब्रम्हचर्याचे पालन करा असा आग्रह करीत नाहीत तर मन आणि मेंदूबरोबरच पंचेद्रियांवर नियंत्रण ठेवून ब्रम्हचर्याचे पालन होवू शकते यावर त्यांचा विश्वास होता हे समाजाला पटवून द्यावे लागेल.

७) गांधी संत होते, तत्ववेत्ते होते यापेक्षा गांधीजींचे राजकिय विचार काय होते हे घासून सांगावे लागेल. एक राजकारणी म्हणून गांधीना समोर आणताना अन्यायाविरूध्द संघर्ष कऱणारे गांधी सांगावे लागतील.

८) गांधी विचारातील धार्मिकता आणि धर्मनिरपेक्षतेच्या जागी सर्वधर्मसमभाव परंपरा सांगावी लागेल कारण आज कोणत्याही परिस्थितीत वर्णाश्रमव्यवस्था मान्य होणार नाही. गांधी धर्माभिमानी असले तरी त्यांच्या धर्म कल्पनेत रूढी व चालीरीतींना जागा नव्हती. गांधी परंपरावादी विचारांचे अभिमानी असले तरी प्रौढ विवाह, प्रेमविवाह, आंतरधर्मिय विवाह यांना त्यांचा पाठिंबा होता या त्यांच्या विचारांची पुर्नमांडणी करावी लागेल.

९) अस्पृश्यतेची त्यांची तळमळ प्रमाणीक होती हे मांडताना गांधी हा प्रश्न हिंदू समाजाच्या अंतर्गत सोडवू इच्छीत होते कारण त्यामुळे हिंदू समाज, संस्कृती, परंपरा याविषयी अस्पृश्य समाजामध्ये तिटकारा निर्माण होणार नाही. या विचारधारेला नव्याने सांगावे लागेल प्रस्थापित परिस्थिती विचारात घेता अस्पृश्य समाजात हिंदू विशेषत: उच्चवर्णीय यांच्या बद्दल मनामध्ये निर्माण झालेला द्वेष गांधी काढून टाकण्यासाठी प्रयत्नशील होते.

१०) गांधीजी आणि बाबासाहेब आंबेडकर यांच्यामध्ये आर्थिक स्वालंबनाच्या बाबतीत टोकाची मते होती. गांधीचा मार्ग बाबासाहेबांना मान्य नव्हता. ग्रामीण जीवनमानाला प्राधान्य देवून ग्रामीण अर्थव्यवस्था ही पुन्हा परंपरावादी अस्पृश्यता निर्माण करेल असे बाबासाहेबांना वाटत होते पण वरिष्ठांच्या नेतृत्वाखाली असेल्या संघटना अस्पृश्यांना न्याय मिळवून देतील असे गांधीजींना वाटत होते. याठिकाणी दोघांच्या भूमिकाही परस्पर पुरक दिसतात फक्त मार्ग वेगळे होते गांधी सवर्णांना सुधारण्याचा प्रयत्न करीत होते. सवर्णांना त्यांनी केलेल्या अन्यायाची जाणीव करून देत होते तर बाबासाहेब दलीतांना या दोन्ही नेत्यांच्या तात्विक विरोधाच्या भूमिका त्यांच्या अनुयायांना समजावून सांगाव्या लागतील.

११) विभक्त मतदार संघाने स्पृश्य अस्पृश्यामध्ये दुफळी निर्माण होईल, माझ्या हरिजन बांधवाच्या प्रगतीत अडथळा निर्माण होईल, इंग्रजाच्या जातीय निवड्याने अस्पृश्यतेचा कलंक अधिकच गडद होईल अशी भूमिका गांधीनी मांडून उपोषण केले त्यातूनच पुणे करार झाला पण गांधीजीनी विरोध केल्यामुळे आम्हाला विभक्त मतदार संघ मिळाले नाहीत या रूजलेल्या भावनेला उत्तर देण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. धाडसाने असे म्हणता येईल की बाबासाहेबांनी आणि गांधीजींनी पुणे करार केला नसता तर भारताची आणखी एक फाळणी पाहायला मिळाली असती. गांधीनी केलेल्या उपोषणामुळे काही कर्मठ हिंदू दुखावले गेले.

१९३४ साली त्यांच्या मोटारीवर बॉम्ब टाकून त्यांना मारण्याचाही प्रयत्न झाला होता हा हि इतिहास सांगावा लागेल.

**निष्कर्ष :-** हाडामासांचे गांधी २० व्या शतकात संपले पण २१ व्या शतकात गांधी विचार जिवंत ठेवण्यासाठी आपल्याला त्यांच्या निर्गुण निराकार रूपाचेच रक्षण करावे लागेल. गांधी नावाची ज्वाला सत्ताधीशांच्या तावडीतून मुक्त करावी लागेल. गांधी विचारावरील विस्तवाची राख झटकून काढावी लागेल थोडक्यात गांधींजीमधला माणूस सांगावा लागेल. राम मनोहर लोहिया यांनी गांधी वादाचे ३ प्रकार सांगितले आहेत.

१. सरकारी गांधीवादी :- जो सरकारी मलई खातो.
२. मठाधिश गांधीवादी :- ज्याने आश्रम बनविले गांधीना संतपद देवून मर्यादित करून टाकले.
३. कडू बेण्याचे गांधीवादी :- ज्यांनी खरे-खुरे गांधी समजून घेतले आणि समाजासमोर मांडले. गांधी विचारांना नवी प्रतीके देत असताना तिसऱ्या प्रकारचे गांधीवादी कार्यकर्ते निर्माण झाले पाहिजेत.

**संदर्भ :-**


१) नथुरामायण : य.दि.फडके
२) महात्मा गांधी एक विचार : दिपक साळुंखे
३) गांधी विचार नवे प्रतीके : योगेंद्र यादव
४) लोकप्रभा :लैंगिकतेच्या आयामातून गांधीचा शोध
५) जेम्स ॲडम्स : गांधी नेकड ॲम्बीशियन्स
६) गांधी मानव महामानव : जगन फडणीस
७) अखेर गंगेत गगन वितळले : अंबरीष मिश्र
८) महात्मा गांधी : नलीनी पंडित
९) गांधी विचारांचा विकास व काही दिशा : डॉ.यशवंत सुमंत
१०) गांधी अवर फादर : कुमार केतकर


❑❑❑